# विशेष सर्व साधारण सभा नोटीस

पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सेनापती बापट रोड, पुणे येथील इमारतींच्या पुनर्विकास योजनेसाठी विशेष सर्वसाधारण सभा संस्थेच्या शेजारील मुनोत सभागृह येथे रविवारी दि. २५.०६.२०२३ रोजी सायंकाळी ४:०० वाजता आयोजित केली आहे. संस्थेच्या पंच समितीने प्राप्त निविदांची छाननी करून प्राप्त निविदाधारकांची गुणवत्ता, प्रतिष्ठा, अनुभव आणि स्पर्धात्मक दर इत्यादी बाबी तपासून तसेच विकसकांचे प्राथमिक सादरीकरण करून सभासदांच्या समोर ठेवले आहेत. त्यांच्या आलेल्या निविदा संस्थेच्या पंच समितीने सभासदांनी अभ्यासण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात ठेवले आहेतच. व संस्थेच्या सभासदांकरिता सदर ०३ निवडक विकसकांचे सादरीकरण दि. २५.०६.२०२३ रोजी सकाळी ९:३० पासून दुपारी ३:३० पर्यत मुनोत सभागृहात होणार आहे. तरी आता सदर ०३ निवडक विकसकापैकी एकाची निवड संस्थेच्या पुनर्विकास कामी करण्यासाठी सदर विशेष सर्वसाधारण सभा आयोजित केली आहे. सदर विशेष सर्वसाधारण सभा ही मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे(१), पुणे यांचे प्राधिकृत अधिकारी यांच्या उपस्थिती मध्ये होणार आहे. सदर विशेष सर्वसाधारण सभेपुढे खालील विषय मांडण्यात येणार आहेत.

**विषय क्र. ०१**: संस्थेच्या पुनर्विकासासंदर्भात प्राप्त झालेल्या निविदाची छाननी करून प्राप्त निविदाधारकाची गुणवत्ता, प्रतिष्ठा, अनुभव आणि स्पर्धात्मक दर इत्यादी बाबी तपासून ०३ निविदा धारकांचे सभासदासमोर दि. २५.०६.२०२३ रोजी क्रमाने सादरीकरण होणार आहे. सदर ०३ निविदाधारकापैकी एकाची विकसक म्हणून निवड करणे, त्याकरिता सभासदांचे गुप्त मतदान घेणे.

**विषय क्र. ०२**: विकसकांबरोबर करावयाच्या कराराच्या मुख्य अटी व शर्ती निश्चित करणे. सदर मुख्य अटी व शर्तींचा मसुदा संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहे. त्याकरिता सभासदांची मान्यता घेणे.

**विषय क्र. ०३**: विषय क्र. ०१ नुसार निवड करण्यात येणाऱ्या विकसकांस सभासदांनी स्वीकृती दिलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून इरादापत्र (Letter of Intent) देण्याकरिता इरादापत्रावर सह्या करण्याचे अधिकार संस्थेचे मा. अध्यक्ष व सेक्रेटरी यांना देणे.

**विनायक पटवर्धन सचिव**

दिनांक: १०.०६.२०२३

**तळटीप**: सदर विशेष सर्वसाधारण समेस केवळ सभासद / सहसभासद सहयोगी सभासद / नाममात्र सभासद यांनाच उपस्थित राहता येईल. एक सभासदाला (सभासद / सहसभासद/ सहयोगी सभासद/ नाममात्र सभासद इ. मिळून) एकच मत देता येईल.